# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१२६ दिनांक - ०१/०४/२०२४

**व्यावसायिक प्रतिस्पर्ध्यांना गुंतविण्यासाठी प्रतिस्पर्धी व्यावसायिकाचे दुकानात जाणीवपुर्वक अग्नीशस्त्रे व जिवंत काडतुस ठेवणाऱ्या तसेच इतर प्रतिस्पर्धी व्यावसायिकाचे दुकानात ठेवण्यासाठी अग्नीशस्त्रे व जिवंत काडतुस स्वत:जवळ बाळगणाऱ्या आरोपीतांना गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा मार्फत अटक करण्यात यश**

दिनांक ३०/०३/२०२४ रोजी पोहवा-सावंत यांना मिळाली की, गोल्डन नेस्ट सर्कल जवळ असणाया अलम स्टील अँड फर्नीचर, येथे काम करणाया इसमां कडे विनापरवाना पिस्टल व जिवंत राउंड आहेत. सदरची माहीती मा. वरिष्ठांना कळवुन त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे सदर ठिकाणी जाउन शहनिशा करता. इसम नामे १) फिरोज आलम शफीऊल्ला चौधरी वय-३९ वर्षे, व्यवसाय- व्यापार, रा. कमल पार्क-१, रुम नं. १०४, मिरा-भाईंदर ओव्हर ब्रिजचे बाजुला, रेशन ऑफीस जवळ, गोल्डन नेस्ट सर्कल जवळ, नवघर,भाईंदर पुर्व. ता.जि. ठाणे याच्या ताब्यात १ गावठी पिस्टल व १० जिवंत काडतुस तर २) शाकीर अब्दुल वहाब चौधरी वय-३८ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. मेडतीया हेरिटेज बिल्डींग , रुम नं. ४०३, कुरेशी हाऊस जवळ, लोढा बॅक रोड, नयानगर, मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे मुळ रा. ग्राम पडीयॉ, तहसिल डुमरियागंज जिल्हा सिध्दार्थ नगर, राज्य उत्तर प्रदेश याच्या ताब्यात १ गावठी पिस्टल व ६ जिवंत काडतुस मिळून आले. सदर बाबत नयानगर पोलीस ठाणे येथे गुरक्र १७९/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह महा. पोलीस अधिनियम ३७(१)(क), १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर दोन्ही इसमांकडे केलेल्या चौकशीमध्ये त्यांनी माहीती दिली की, फिरोज ऊर्फ इब्राहीम आलम शफीऊल्ला चौधरी याला व्यवसायामध्ये १) अमान स्टिल किचन इक्वीपमेंट चा मालक अनिस ऊर्फ मुन्ना खान २) अमान स्टिल किचन इक्वीपमेंट चा मालक कमिल खान ऊर्फ कलिम व ३) शादाब स्टिलचा मालक शादाब यांच्या मुळे भरपुर नुकसान झाले. त्यांना धडा शिकविण्यासाठी त्याचे ओळखीचा व त्याचेकडे पुर्वी काम करणारा मुस्लीम रा. उत्तन ठाणे याचे करवी त्याने ६ गावठी पिस्तुले व जिवंत काडतुसे मागविले. त्यापैकी दोन गावठी पिस्तुले व जिवंत राऊंड तिन दिवसांपुर्वी त्याने स्वत: अनिस ऊर्फ मुन्ना खान याचे अमान स्टिल किचन इक्वीपमेंट या दुकानातील वडापाव/पाणीपुरी साठीचे काऊंटरच्या कपाटामध्ये ठेवले तर दोन पिस्तुले व १२ राऊंड त्याने एका सॅक बॅगेमध्ये ठेवुन ते वर्सोवा पुलावरुन खाडीत फेकुन दिले. तसेच त्याचे कडे सापडलेले पिस्तुल व राऊंड तो एक दोन दिवसात अमान स्टिल किचन इक्वीपमेंट चा मालक कमिल खान ऊर्फ कलिम याचे दुकानात ठेवणार होता. तसेच शाकीर अब्दुल वहाब चौधरी याचे ताब्यात मिळुन आलेले पिस्तुल व राऊंड तो एक दोन दिवसात शादाब स्टिलचा मालक शादाब याचे दुकानात ठेवणार होता अशी माहीती दिली.

त्यांनी दिलेल्या माहीतीप्रमाणे पडताळणी करता, आरोपीतांनी अनिस ऊर्फ मुन्ना खान याचे अमान स्टिल किचन इक्वीपमेंट या दुकानातुन सोहमकुमार यांना विक्री केलेल्या वडापाव/पाणीपुरी साठीचे काऊंटरच्या कपाटामध्ये मिळून आलेल्या २ गावठी पिस्टल व ४३ जिवंत राउंड संदर्भात काशिमिरा पोलीस ठाणे गुरक्र २२०/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह महा. पोलीस अधिनियम ३७(१)(क), १३५ अन्वये गुन्हा नोंद असल्याचे निष्पन्न झाले.

अद्यापपावेतो सदर कारवाईमध्ये एकुण ४ गावठी पिस्टल व ५९ जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त साो, मा. श्री. श्रीकांत पाठक, अतिरिक्त पोलीस आयुक्त साो मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि-१, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त साो, गुन्हे शाखा, मा. श्री विजयकुमार मराठे, सहा पोलीस आयुक्त मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.निरी अविराज कुराडे, सपोनिरी प्रशांत गांगुर्डे, सपोनिरी पुष्पराज सुर्वे, सफौ संदीप शिंदे, पोहवा/अविनाश गर्जे, पो.हवा/ संजय शिंदे, पोहवा संतोष लांडगे, पोहवा-पुष्पेंद्र थापा, पो.हवा./ सचिन हुले, पोहवा/सचिन सावंत, पो.हवा./ विजय गायकवाड, पो.हवा./ सुधीर खोत, पो.हवा./ विकास राजपुत, पो.शि. प्रशांत विसपुते, पो.कॉ./ सनी सुर्यवंशी, पोशि/गौरव बारी, पो.शि./ धिरज मेंगाणे तसेच काशिमिरा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, पोउपनि खाडे व पोहवा-मोहीले यांनी केली आहे.

**----0000----**